# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

क्र- रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.१८/का.५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २४/११/२०२१

प्रति,
आयुक्त,
धुळे, नांदेड-वाघाळा, अहमदनगर व सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका

विषय :- महानगरपालिका पोटनिवडणूक - डिसेंबर, २०२१
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०९/११/२०२१ चे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील महानगरपालिकांमधील ४ रिक्त पदांची पोटनिवडणूक घेण्याकरीता मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे. आता या पत्रान्वये खाली नमूद केलेल्या रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीकरीता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम परिशिष्ट-१ प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | प्रभाग क्र. |
|---|---|---|
| १ | धुळे | ५ ब |
| २ | अहमदनगर | ९-क |
| ३ | नांदेड-वाघाळा | १३-अ |
| ४ | सांगली-मिरज-कुपवाड | १६-अ |

२. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता निवडणूक होणाऱ्या संबंधित प्रभागात लागू राहील. मात्र या प्रभागातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

३. महानगरपालिकेच्या तसेच मतदार यादीसंदर्भात विविध न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील.तसेच मा.न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकेमध्ये

स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा व त्याबाबत आयोगास अवगत करण्यात यावे.

४. माहे २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी करावयाच्या पूर्वतयारीबाबत राज्य निवडणूक आयोगाने सविस्तर सूचना दिल्या होत्या. त्यासंदर्भातील आयोगाच्या दि.२८/९/२०१८ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रातील सूचनानुसार उपरोक्त रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांच्या वेळी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

५. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १५/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये कोविड-१९ बाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत, त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरूंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट-१

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मुख्य निवडणूक अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय आयुक्त, नाशिक,औरंगाबाद,पुणे विभाग
८. जिल्हाधिकारी,धुळे,नांदेड,अहमदनगर व सांगली.
९. जिल्हा पोलीस अधिक्षक, धुळे,नांदेड,अहमदनगर व सांगली.
१०. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
११. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील सर्व वकील
१२. सहायक आयुक्त(जनसंपर्क),राज्य निवडणूक आयोग
१३. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१५. निवड नस्ती (कार्या.५), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा- २०२१/प्र.क्र.१८/का-५, दि. २४/११/२०२१ सोबतचे परिशिष्ट-१

धुळे (५-ब), नांदेड-वाघाळा (१३-अ), अहमदनगर (९-क) व सांगली-मिरज-कुपवाड (१६-अ)
या महानगरपालिकांमधील रिक्त पदांची पोटनिवडणूक- डिसेंबर, २०२१

| अ.क्र. | टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचा दिनांक | २९/११/२०२१(सोमवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा दिनांक | २९/११/२०२१(सोमवार)स.११.०० ते ०६/१२/२०२१ (सोमवार) दु.२.००पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी | २९/११/२०२१(सोमवार) ते ०६/१२/२०२१(सोमवार) (स.११.०० ते दु.३.०० पर्यंत) दि.०५/१२/२०२१ रोजी रविवार असल्याने नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत. |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी | ०७/१२/२०२१(मंगळवार) (स.११.०० पासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदावारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०९/१२/२०२१(गुरुवार)दु.३.०० पर्यंत |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | १०/१२/२०२१(शुक्रवार) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १०/१२/२०२१(शुक्रवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २१/१२/२०२१ (मंगळवार) सकाळी ७.30 ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २२/१२/२०२१(बुधवार) |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २८/१२/२०२१(मंगळवार) |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरूंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र